RCS- 15/2026
रविकिरण / रामचंद्र
नि- 12/अ

हुकुमनामा

## दाव्याची हुकुमनामा प्रत

(1)

**मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर, न्यायालय अंबाजोगाई जि.बीड**

रे.दि.दावा नं. 15 /२०२६.

**वादी** :- रविकिरण पिता रामचंद्र उर्फ चंदर आडे वय ३३ वर्ष धंदा शेती, रा.काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड.

**विरुध्द**

**प्रतिवादी** :- १) रामचंद्र उर्फ चंदर पिता पोमा आडे वय ७५ वर्ष धंदा शेती, रा.काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड.

२) गंगुबाई भ्र.रामचंद्र उर्फ चंदर आडे वय ६८ वर्ष धंदा घरकाम, रा.काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड.

**दावा** :- वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत.

**वादी आपला दावा प्रतिवादींच्या विरुध्द खालील प्रमाणे सादर करीत आहे.**

१) हे की, वादी आणि प्रतिवादी नं.१ व २ हे मौजे काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहिवाशी असुन प्रतिवादी क्र.१ व २ हे आपसात पती पत्नी असुन ते वादीचे जन्मदाते वडील व आई आहेत. वादी आणि प्रतिवादी क्र.१ व २ हे हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक आहेत. प्रतिवादी क्र.१ यांना रामचंद्र आणि चंदर या दोनही नांवाने ओळखले व बोलले जाते करीता प्रतिवादी क्र.१ चे आधार कार्ड हे रामचंद्र नांवाने असुन दाव्यातील वादग्रस्त जमीनींचे ७/१२ व ८-अ ला चंदर असे नांव नोंदले गेलेले आहे.

२) हे की, वादी आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या हिंदु

पान नं.२ वर ....

RCS- 15/2026
रविकिरण / रामचंद्र
नि- 12/31

(2)



एकत्र कुटूंबाच्या मिळकती मौजे काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड येथे प्रतिवादी नं.१ व २ यांच्या नांवे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्रफळ हे.आर | आकार रु.पैसे | कोणाचे नांवे |
|---|---|---|---|---|
| १) | १/एफ/७/६ | १-६२ | २.२५ | प्रतिवादी क्र.१ चे नांवे |
| २) | १/एफ/७/६ | १-६२ | २.२५ | प्रतिवादी क्र.२ चे नांवे |
| | | **एकुणः ३.२४** | **४.५०** | |

वरिल जमीनींना प्रस्तुत दाव्यात "वादग्रस्त मिळकत" म्हणुन संबोधण्यात आलेले आहे.

प्रआर

३) हे की, वादी आणि प्रतिवादी नं.१ व २ हे हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक असुन वादग्रस्त मिळकती मध्ये वादीचा कायदेशिर १/३ हिस्सा आहे. सदर वादग्रस्त मिळकतीची वादी आणि प्रतिवादी यांचे मध्ये आजतागायत कधीही, कसल्याही प्रकारे वाटण्या झालेल्या नाहीत. वादग्रस्त मिळकतीची वादी आणि प्रतिवादी क्र.१ व २ हे एकत्रित रित्या वहिती करुन उपभोग घेत आले आहेत.

४) हे की, वादग्रस्त मिळकतीची वहिती करण्याच्या कारणांवरुन वादी आणि प्रतिवादी यांचे मध्ये सतत वाद होत आहेत. तसेच वादग्रस्त मिळकती या प्रतिवादी नं.१ व २ यांचेच नांवे महसुल रेकॉर्डला असल्यामुळे वादीला शासनाच्या योजनेचा लाभ घेता येत नाही व सदर जमीनीत विहीर खोदणे व जमीनीची प्रत सुधारणे शक्य होत नाही, ज्यामुळे ईच्छा असुनही वादीला जमीनीपासुन भरघोस उत्पन्न घेता येत -

पान नं.३ वर ....

नाही. करीता वादीने दिनाक १०/१२/२०२५ रोजी प्रतिवादी नं.१ व २ यांना वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करुन त्यातील वादीच्या कायदेशिर १/३ हिस्याचे क्षेत्र वेगळे काढुन ते वादीच्या ताब्यात देण्याची विनंती केली असता, प्रतिवादींनी त्यास स्पष्ट नकार दिला. करीता वादीला प्रतिवादींचे विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले असुन दाव्याचा जवाब देण्याची जवाबदारी प्रतिवादींवर आहे. दावा हक्क प्राप्तीची तारीख १०/१२/२०२५ ईसवी ही आहे.

५) हे की, वादग्रस्त मिळकती या मौ.काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड येथील असुन मा.न्यायालयाच्या स्थळ सिमेत येत असल्यामुळे प्रस्तुतचा दावा दाखल करुन घेवुन त्यावर न्यायनिर्णय देण्याचा मा.न्यायालयास संपुर्ण अधिकार आहे.

६) हे की, वादीचा दावा सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळण्या बाबतचा असल्यामुळे वादी दाव्याचे मुल्य आर्थिक मर्यादेसाठी शेतसाऱ्याच्या २०० पट म्हणजेच ४.५०X२००=९००/- रुपये करित असुन कोर्ट फिस साठी शेतसाऱ्याच्या ८० पट म्हणजेच ४.५०X८०=३६०/- रुपये करत असुन वादीने त्यावर ठराविक कोर्ट फिस रक्कम रुपये २००/- दिली आहे, जी योग्य व पुरेशी आहे.

**तरी विनंती की,**

वादीचा दावा प्रतिवादींच्या विरुध्द खालील प्रमाणे डिक्री करण्यात यावा.

अ) मौ.काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड येथील दाव्यातील परिच्छेद क्र.२ मध्ये दर्शविलेल्या वादग्रस्त मिळकतीची सरस -

पान नं.४ वर ....

Res- 15/2026
रविकिरण / रामचंद्र
नि - 12/अ

(५)



निरस मानाने वाटणी करुन वादीच्या कायदेकिशर १/३ हिस्याचे क्षेत्र वेगळे काढुन ते वादीच्या स्वतंत्र ताब्यात देण्यात यावे.

ब) वादीला प्रतिवादींकडुन दाव्याचा खर्च देण्यात यावा.

क) वादी कायद्यान्वये अन्य ज्या मागणीचा हक्कदार ठरतो ती वादीच्या हक्कात मंजूर केली जावी.

दिनांकः ०६/०१/२०२६. **वादी,**

रविकिरण पिता रामचंद्र उर्फ चंदर आडे
रा.काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड.

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, प्रस्तुतच्या दाव्यातील परिच्छेद क्र.१ ते ४ मधील संपुर्ण मजकुर माझ्या माहिती आणि समजुती प्रमाणे खरा व बरोबर असुन परिच्छेद क्र.५ व ६ मधील मजकुर कायदेविषयक असुन तो वकील साहेबांचे सल्यानुसार खरा व बरोबर आहे, करीता यावर मी आज माझ्या समजुन उमजुन स्वाक्षऱ्या केल्या आहेत, त्या खऱ्या आहेत.फ.

दिनांकः ०६/०१/२०२६. **वादी,**

रविकिरण पिता रामचंद्र उर्फ चंदर आडे
रा.काळवटी लमानतांडा ता.अंबाजोगाई जि.बीड.

मार्फतः

**ॲड.एन.ए.जाधव,**
अंबाजोगाई.

Res. 15/2026
रविकिरण / रामचंद्र
नि. 12/3



(5) नि 19/3

## मा. दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) अंबाजोगाई, जि. बीड यांच्या न्यायालयात.

रेग्यु.दिवाणी दावा क्रं. १५/२०२६.

वादी:

रविकिरण पि. रामचंद्र उर्फ चंदर आडे

विरूद्ध.

रामचंद्र उर्फ चंदर पि. पोमा आडे वगैरे

प्रकरणः- वाटणी करून स्वतंत्र ताबा मिळणेबाबत.

प्रस्तुत दाव्यात वादी आणि प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यामध्ये आप-आपासत खालीलप्रमाणे समजपत्र दाखल करण्यात येत आहे.

### तडजोड/समजपत्र.

प्रतिवादी क्र. १ व २

१. हे की, वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ हे एकत्र कुटूंबाचे घटक असुन प्रतिवादी क्रं. १ व २ हे आपसात पती-पत्नी असुन ते वादीचे जन्मदाते आई-वडील आहेत. हे उभयतांना मान्य व कबुल आहे. प्रतिवादी क्रं. १ यांना रामचंद्र आणि चंदर या दोन्ही नावाने ओळखले जाते. प्रतिवादी क्रं. १ चे आधार कार्ड हे रामचंद्र नावाने असुन दाव्यातील वादग्रस्त जमीनीचे ७/१२ व ८/अ मध्ये चंदर असे नाव नोंदविले गेले आहे.

२. हे की, मौजे. काळवटी लमान तांडा, त. अंबाजोगाई, जि. बीड येथे प्रतिवादी क्रं. १ चे नावे असलेली जमीन गट क्रं.

१/एफ/७/६ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर, आकार २ रूपये २५ पैसे तसेच प्रतिवादी कं. २ च्या नावे असलेली जमीन गट नंबर १/एफ/७/६ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर, आकार २ रूपये २५ पैसे अशा जमीनी असल्याचे उभयतांना मान्य व कबुल आहे.

३. **हे की**, वादी व प्रतिवादी कं. १ व २ हे एकत्र कुटूंबाचे घटक असुन वादग्रस्त मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीर हिस्सा आहे. सदर वादग्रस्त मिळकतीच्या वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये आजतागायत कधीही, कसल्याही प्रकारे वाटण्या झालेल्या नाहीत हे उभयतांना मान्य व कबुल आहे.

४. **हे की,** वादी व प्रतिवादी कं. १ व २ यांच्यामध्ये आपसात गैरसमजुतीमधुन प्रस्तुतचे प्रकरण उद्भवले होते. परंतु आता वादी व प्रतिवादी यांनी आपसातील वाद आपअपसात एकमेकांच्या राजीखुशीने मिटला असुन वादग्रस्त मिळकतीच्या वादी व प्रतिवादी यांनी आपसात वाटण्या करून घेण्याचे ठरविले आहे हे वादी व प्रतिवादी कं. १ व २ यांना मान्य व कबुल आहे.

५. **हे की,** वादी व प्रतिवादी कं. १ यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकतीबाबत पोहचणारे सर्व कायदेशीर हक्क त्यांनी त्यांच्या राजीखुशीने विनाअट आणि विना मोबदला कायमचे वादीच्या हक्कात सोडून दिलेले आहेत. हे वादी व प्रतिवादी कं. १ व २ यांना मान्य व कबुल आहे.

RCS- 15/2026
रविकिरण / रामचंद्र
नि. १२/अ.



६. **हे की,** मौजे काळवटी लमान तांडा, त. अंबाजोगाई, जि. बीड येथे प्रतिवादी कं. १ चे नावे असलेली जमीन गट कं. १/एफ/७/६ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर, आकार २ रूपये २५ पैसे ज्याच्य चतु:सिमा खालीलप्रमाणे आहेत :-

पुर्वेस :- सय्यद अफजलोद्दीन यांची जमीन
पश्चिमेस :- रस्ता.
दक्षीणेस :- गोविंद भाऊराव कोरडे यांची जमीन.
उत्तरेस :- गायरान.

ही जमीन वादी यास या तडजोड/समेटपत्राप्रमाणे वाटून देण्यात आलेली आहे. तसेच प्रतिवादी कं. २ नामे गंगुबाई भ्र. रामचंद्र उर्फ चंदर आडे यांना वाटून आलेली जमीन मौजे काळवटी लमान तांडा, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील जमीन गट कं. १/एफ/७/६ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर, आकार २ रूपये २५ पैसे ज्याच्या चतु:सिमा :-

पुर्वेस :- प्रतिवादी कं. १ यांची जमीन
पश्चिमेस :- रस्ता.
दक्षीणेस :- गोविंद भाऊराव कोरडे यांची जमीन.
उत्तरेस :- रस्ता.

वर नमुद वादग्रस्त जमीन ही आहे तशी कायम प्रतिवादी कं. २ यांच्या नावे कायम ठेवण्यात आलेली आहे.

७. **हे की,** प्रस्तुत समजपत्राआधारे वादी व प्रतिवादी कं. १ व २ यांच्यामध्ये आपसात तडजोड/समेटपत्र वर नमुद चतु :सिमेच्या आतील जमीनीबाबत झालेले असुन ते उभयतांना मान्य व कबुल आहे. सदर समजपत्राप्रमाणे त्यांनी आपआपली नावे

महसुल दप्तरी नोंदवुन घ्यावीत व सदर जमीनीचा ते वंश परंपरागत उपभोग घेत जातील, त्यास ते एकमेकांस हरकत अथवा उजर करणार नाहीत. आता, वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यामधील मतभेद संपलेले असुन सदरील वाद प्रस्तुतच्या तडजोड/समेटपत्राद्वारे कायमस्वरूपी मिटला आहे. तरी सदरील तडजोड/समेटपत्राप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येणे योग्य व आवश्यक आहे.

तरी विनंती की,

प्रस्तुतचे प्रकरण वरील तडजोडीप्रमाणे
निकाली काढण्यात यावे.

दिनांकः- १४/०३/२०२६.

प्रतिवादी क्रं. १ व २.

१. रामचंद्र उर्फ चंदर
पि. पेमा आडे.

२. गंगुबाई भ्र.रामचंद्र
उर्फ चंदर आडे.

वादी.

रविकिरण पि.रामचंद्र उर्फ
चंदर आडे.

प्रतिवादींतर्फे विधीज्ञ.

ॲड. बी.जी.गायके.
अंबाजोगाई.

वादीतर्फे विधीज्ञ.

ॲड. एन.ए.जाधव,
अंबाजोगाई.

Plaintiffs and defendants and
their advocates present. They
admitted their signature
& verified the contents in the
affidavit to be true & correct.
Hence Read & Recorded.

14-03-24

(१) (७)

**प्रपत्र - आय**

**लोक न्यायालय नियमावलीचे नियम १२.५२ (५)**

नि- १०/8

# डॉकेटशीट

तालुका विधीसेवा समिती, अंबाजोगाई
येथील न्यायालयात प्रलंबीत असलेले प्रकरण क्रमांक

वादी / अर्जदार :- रविकिरण रामचंद्र उर्फ चंदर आडे

विरुध्द

प्रतिवादी / गैरअर्जदार :- रामचंद्र उर्फ चंदर पि भोमा आडे

प्रकरण :- मालकी ताबा मिळणे कामी

अंबाजोगाई येथे दिनांक रोजी आयोजित केलेल्या लोक न्यायालयात तडजोड झालेल्या प्रकरणातील तडजोड पत्र.

प्रकरण आपसात तडजोड होऊन मिटले / मिटले नाही.

ठिकाण :- अंबाजोगाई

दिनांक :- 14/03/2026

14-03-26

पॅनल प्रमुख

(10)

COMPROMISE MEMO IN PENDING CASES
CIVIL / CRIMINAL

Type of Cases :- RCS 15/2026 नि. 11/B
Case No. :-

Shri. Ravikiran Plaintiff / Applicant / Chairman

Versus

Shri. Ramchandra @ Chandu Defendant / Respondent/Opponent

MAY IT PLEASE YOUR HONOUR

Dispute in brief is regarding ______________ as per exh.No.1 in the above said case parties have arrived at the compromise and settled he matter as follows.

TERMS OF COMPROMISE

1) As per compromise pursis
2) ______________
3) ______________
4) ______________

We have arrived at the compromise terms willingly before the Lok Adalat.

Place : Ambajogai.
Date :

(1) ५५२ ३११३

(2) [signature]

( [signature] )
Signature of the Plaintiff / Applicant / Claimant

( )
Signature of the Defendant / Respondent / Opponent

( [signature] )
Signature of the Advocate for Plaintiff / Applicant / Claimant

( [signature] )
Signature of the Advocate for Defendant/Respondent/Opponent

AWARD

This matter is amicably settled before the Lok Adalat held on.....14-03-24.....Ambajogai before the Panel consisting of

1. / Head of the Panel

2. Adv. R. S. SAPTE. Member

3. Member

And Award is passed as per the terms of Compromise at Exh. ______ Enclosed herewith.

14-03-24

Head of the Panel

( Member ) ( Member )

Authentic/True Copy

Seal

(११)

नियमीत दिवाणी दावा क. 15/2026
रविकिरण/ रामचंद्र उर्फ चंदर
नि. क. 12/अ

................ याने दाव्याच्या खर्चा बददल रक्कम रुपये .................................. आज तारखेपासून ................... .च्या तारखेपर्यत त्यावर दरसाल दर शेकडा .................. या दराने होणा–या .......................व्याजासह..............................याजला दयावे

## खर्चाचा आकडा

| वादीला झालेला | | | | प्रतिवादीला झालेला | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु | पैसे | | | रु | पैसे |
| 1 | फिर्याद अर्जास स्टॅम्प ... | 200 | 00 | 1 | वजावटीच्या किंवा विरुध्द दाव्यास स्टॅम्प ... | 00 | 00 |
| 2 | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प ... | 10 | | 2 | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प ... | 10 | 00 |
| 3 | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प ... एकूण पूढील बाजूवर दिलेली ... | | 00 | 3 | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प एकूण पूढील बाजूवर दिलेली ... | 00 | 00 |
| 4 | साक्षीदारास पोटगी ... | -- | 00 | 4 | साक्षीदारास पोटगी ... | 00 | 00 |
| 5 | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी विरुध्द दाव्यावरील प्लीडराची फी ... | 150 | 00 | 5 | प्लीडराची फी प्लीडराची फी विरुध्द दाव्यावरील | 150 | 00 |
| 6 | प्रोसेसी लागू करणे ... | 20 | 00 | 6 | प्रोसेसी लागू करणे ... | 00 | -- |
| 7 | कमिश्नरची फी ... | -- | -- | 7 | कमीश्नरची फी ... | -- | -- |
| 8 | भाषांतराची फी ... | -- | -- | 8 | भाषांतराची फी ... | -- | -- |
| 9 | नकला करण्याची फी ... | -- | -- | 9 | नकला करण्याची फी ... | -- | -- |
| 10 | तहकूबीबध्दल दिलेला .. | -- | -- | 10 | तहकुबीबद्दल दिलेला ... | -- | -- |
| 11 | वारस दाखल करण्याबघलच्या अर्जावरील स्टॅम्प | -- | -- | | | | |
| | एकूण ... | 380 | 00 | | एकूण ... | 160 | 00 |
| | न दिलेला खर्च | | | | न दिलेला खर्च | | |
| | फिर्याद अर्जावरील ... | -- | -- | -- | विरुध्द दाव्यावरील ... | -- | -- |
| | प्लीडराच्या फीवरील ... | -- | -- | -- | प्लीडराच्या फीवरील ... | -- | -- |
| | प्रोसेसीवरील ... | -- | -- | -- | प्रोसेसीवरील ... | -- | -- |
| | दाखल झालेल्या कागदावरील (पुढील बाजूवर पहा ) | 10 | | | दाखल झालेल्या कागदावरील(पुढील बाजूवर पहा ) | | 00 |
| | बाकी ... | 370 | 00 | | बाकी ... | 160 | 00 |

कारकून

वादिचे वकील. ॲड. एन.ए.जाधव,
प्रतिवादी वकील. बी.जी.गायके

आज तारीख 27 माहे 03 सन 2026
रोजी आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी

27/03/26

( प्रविण पी. सागडे )
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
अंबाजोगाई

(हया मूकदम्यातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते (परत) नेले नसते तर अपील झाले असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र होतील)

नियमीत दिवाणी दावा क. 15/2026
रविकिरण/ रामचंद्र उर्फ चंदर
नि. क. 12/अ

| वादीकडून | | | | प्रतिवादीकडून | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु | पैसे | | | रु | पैसे | |
| दिलेला खर्च | -- | -- | -- | दिलेला खर्च | -- | -- | -- |
| दाखल झालेले कागद नंबर | -- | -- | -- | दाखल झालेले कागद नंबर | -- | -- | -- |
| नि | -- | | -- | | -- | | -- |
| न दिलेला खर्च | | | -- | न दिलेला खर्च | -- | -- | -- |
| दाखल झालेले कागद नंबर<br>नि 4/10 | --<br>10 | | -- | दाखल झालेले कागद नंबर | | -- | -- |
| एकूण | 10 | -- | -- | एकूण | ०० | -- | -- |

(२०) (१२)

नियमीत दिवाणी दावा क. 15 / 2026
रविकिरण / रामचंद्र उर्फ चंदर
नि. क. 12 / अ

आज दिनांक १४ माहे ०३ सन २०२६ रोजी श्री. प्रविण पी.सागडे. सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, अंबाजोगाई यांच्यासमोर, वादी तर्फे अॅड. एन.ए.जाधव प्रतिवादी तर्फे बी.जी.गायके यांच्या समक्ष अखेर मुकादमा निकाली निघाला असुन असा हुकूम होतो की,

ORDER

01. The Sut is hereby disposed off as withdrawn in view of pursis at Exh- 09. The compromise Pursis at Exh. 09 is part and parcle of the decree.

02. Decree be drawn up accordingly.

03. court fees be refunded as per rules.

सही/-

दिनांक:- २७/०३/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क स्तर
अंबाजोगाई